# महात्मा गांधीचे हिंद स्वराज्य आणि जागतिकीकरण

**प्रा. डोंगरे एल.बी.**

**राज्यशास्त्र विभागप्रमुख, हु.ज.पा. महाविद्यालय, ता.हिमायतनगर जि. नांदेड**

विश्वातील सर्व मानवी हिताचा ध्यास घेवून नवसमाज निर्मितीचे दिव्य मानवतावादी तत्त्वज्ञान विश्वाला महात्मा गांधीजीच्या विचारांची नितांत आवश्यकता भारतालाच नव्हे, तर विश्वाला आहे. गांधीवादी तत्त्वज्ञान, आत्मशांतीपासून ते विश्व शांतीपर्यंत, गावा पासून ते विश्वापर्यंत, शांती साधक अहिंसेपासून क्रांतीकारी अहिंसेपर्यंत त्यांचे विचार मानवी जीवनाचे प्रेरणास्थान बनले आहे. महात्मा गांधीच्या जीवनकार्याबाबत महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन म्हणतो, 'महात्मा गांधीसारखा माणूस या पृथ्वीतलावर झाला याचा आजच्या आणि भविष्यकाळातील पिढयांचा विश्वास बसणार नाही.' सत्य, अहिंसा, सत्यागृह, अपरिगृह, ग्रामराज्य, चरखा, खादी, नैतिकता, अध्यात्म, सर्वोदय, स्वदेशी, हिंद स्वराज्य या आदर्श आणि अभिनव विचारांचे प्रतीक महात्मा गांधी आहेत. महात्मा गांधी यांनी इग्लंडहून दक्षिण आफ्रिकेत परततांना जहाजावर हिंद स्वराज्य या विचारधनाचे लेखन केले आहे. हिंद स्वराज्य हे मूळ गुजराती भाषेत आहे. दक्षिण आफ्रिकेतील Indian Opinion या साप्ताहिकाने ते १९०९ ला पहिल्यांदा प्रकाशित केले. महात्मा गांधी यांनी हिंदस्वराज्यमध्ये पाश्चात्य संस्कृतीवर कडाडून टिका करून भारताच्या संदर्भात आदर्श सभ्यतावादी, मानवतावादी अशा समाजाचे निळ चित्र हिंद स्वराज्याच्या माध्यमातून रेखाटले आहे.

**हिंदस्वराज्य आणि जागतिकीकरण :-**

जागतिकीकरण हि संकल्पना महात्मा गांधीच्या हिंद स्वराज्याशी परस्पर विरोधी व विसंगत अशी संकल्पना आहे. विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि अर्थ कारणात आमूलाग्र परिवर्तनाची चळवळ सुरू झाली. या आर्थिक परिवर्तनाचे चळवळीची कारणे, सोव्हियत संघराज्याचे विघटन, पूर्वयुरोपात साम्यवादाची पिछेहाट, अमेरिकेची एकध्रुविय अर्थव्यवस्था अशा राजकीय आर्थिक परिवर्तनाचा परिपाक म्हणून नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था उदयास आली आहे. या नव्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणजे जागतिकीकरण होय. विज्ञान तंत्रज्ञानाच्या अमुलाग्र परिवर्तनाने राष्ट्राराष्ट्रातील,

लोकालोकांतील अंतर कमी होऊन जग हे एक Global village जागतिक खेडे बनले आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून औद्योगीक, भौतिक प्रगती आकर्षक वाटत असली तरी याचा लाभ भांडवलदार व शासनकर्त्यांला झाला. जागतिकीकरणाच्या प्रभावातून औद्योगिक, वैज्ञानिक, भौतिक प्रगती झाली असली तरी मानवाची नैतिक अधोगती होत आहे. महात्मा गांधीच्या विचारांचा केंद्रबिंदू असलेला माणूस हा भूकेकंगाल झाला आहे. बेकारी, गरिबी, दारिद्रय, कुपोषण, प्रदूषण, भ्रष्टाचार, अनैतिकता, अन्याय, अत्याचार नैतिक अधोगती होऊन मानवी समाज हा विनाशाच्या वळणावर येऊन पोहोचला आहे. या गंभीर धोक्याची सूचना महात्मा गांधी यांनी हिंद स्वराज्याच्या माध्यमातून दिली होती. परंतु समाजातील समाजधुरीणांनी व राज्यकर्त्यांनी या सुचनेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. मानवी भौतिक सुखाला चंगळवादाला अनैतिकतेला, हिंसेला गांधीचा विरोध होता. आज जागतिकीकरणाच्या या युगात मानवी समाजाला भौतिक सुखसोईचे गाजर दाखवून नागविले जात आहे. लहान-लहान ग्रामीण उद्योगधंद्यांचे पुरस्कार गांधीजींनी केला होता. परंतु जागतिकीकरणाच्या माध्यमातून लहान -लहान उद्योगधंदे नेस्तनाबूत करून जागतिकीकरणाने जगाला एका बाजारपेठेत परिवर्तीत केले आहे. हिंद स्वराज्यात महात्मा गांधी यांनी पाश्चात्य देशातील संस्कृतीवर घणघाती हल्ला करून तिच्या विरूद्ध बंड पुकारून पाश्चात्य संस्कृती कशी विनाशकारी आहे. व नाशवंत आहे. हे व्यवस्थीतपणे पटवून दिले आहे. परंतु जागतिकीकरणाचा प्रभाव हा आर्थिक क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला नाहीतर तो या देशातल्या राजकारणावर, समाजकारणावर, संस्कृतीवर विपरित असे परिणाम झाले आहेत. हिंद स्वराज्यात पाश्चात्य संस्कृतीचे जे वर्णन महात्मा गांधी यांनी केले होते त्याहीपेक्षा भयानक व विनाशकारी संस्कृती महात्मा गांधीच्या देशात फोफावत आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतात सभ्यतायुक्त संस्कृतीऐवजी चंगळवादी संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. हिंद स्वराज्यात महात्मा गांधी यांनी डॉक्टर, वकील, रेल्वे या तीन बाबीमुळे भारत हा कंगाल झाला आहे. असे त्यांचे मत होते. गांधीनी ज्या बाबीला नैतिकतेचा आधार नाही अशा सर्वच बाबींना विरोध दर्शविला आहे. परंतु जागतिकीकरणाच्या या प्रवाहात महात्मा गांधीच्या सत्याऐवजी असत्य, अहिंसेऐवजी हिंसा, न्यायाऐवजी अन्याय, नैतिकताऐवजी अनैतिकता, सभ्यतऐवजी असभ्यता, स्वराज्याऐवजी पारतंत्र्य, अध्यात्माऐवजी चंगळवाद या नवीन मूल्यांचा

मानवी जीवनावर प्रभाव दिसून येत आहे. डॉक्टर आणि वकिलाबाबत गांधी म्हणतात, या दोन्हीही व्यवसायाचे मूळ अनिती आहे. डॉक्टर आणि इस्पीतळे पापाचा पाया आहे. असे म्हणतात. गांधीच्या या विचाराचे प्रतिबींब आज समाजात दिसून येत आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून चंगळवाद मानवी जीवनात वाढला आहे. मानवाच्या जीवन पद्धतीत आमूलाग्र बदल झाल्यामुळे त्याचे जीवन हे यांत्रिकी स्वरूपाचे झाले आहे. त्यामुळे मानवी आरोग्य ढासळले आहे. ढासाळलेले आरोग्य सावरण्यासाठी माणूस हा डॉक्टर व इस्पीतळाचा आधार घेत आहे. त्यातून डॉक्टरांचे महत्त्व वाढले आहे. मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल निर्माण होत आहेत. माणसाचा देव असणारा डॉक्टर सामान्य माणसाचे आर्थिक शोषण करून अनैतिक व्यवहार चालू आहे. डॉक्टरी पेशा हा प्रतिष्ठा आणि अमाप पैसा मिळवून देणारा धंदा आहे. डॉक्टरी व्यवसाय हा सेवा किंवा परोपकार नसून अमाप पैसा जमा करण्याचे ते साधन बनले आहे. पैशासाठी ही डॉक्टर मंडळी कोवळया कळया उमलण्याआधीच त्यांना संपविण्याचे काम करीत आहेत. म्हणून डॉक्टरी पेशाला नैतिक आधार नाही. डॉक्टर व इस्पीतळे हे पापाचा पाया आहे. या गांधीच्या विचाराचे प्रतिबिंब डॉक्टरांच्या वेगवेगळया कारनाम्यातून किंवा दांभिकपणातून दिसून येत आहे. म्हणून गांधीजींनी ही धोक्याची सुचना हिंद स्वराज्याच्या माध्यमातून दिली होती. परंतु या सुचनेकडे गांभीर्याने न बघितल्यामुळें पाश्चात्य संस्कृतीचे अभिसरण किंवा प्रभाव भारतीय संस्कृतीवर दिसून येत आहे. भारतीय माणूस हा पाश्चात्य संस्कृतीचा गुलाम बनला आहे. महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाकडे दुर्लक्ष करून पाश्चात्य संस्कृतीचे भारतीय माणूस हा पाईक झाला आहे. म्हणून या पाश्चात्य संस्कृतीच्या जाळयातून मुक्त व्हायचे असेल तर भारतालाच नव्हे, तर जगाला महात्मा गांधीजींच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :-**

जागतिकीकरणाच्या माध्यमातून मानवकेंद्रीत विकास झाला पाहिजे, या विकासाला मानवी चेहरा मानवी मूल्यांना प्राधान्य देणारी, मूलभूत मानवी गरजा पूर्ण करून समानसंधी निर्माण करणारी समाजव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे. त्याला निसर्गावर मात करून जगण्याची धडपड विनाशकारी आहे. त्यामुळे निसर्गाचा योग्य उपयोग व विचार करून जीवनशैली ठेवण्याचा पर्यंत केला पाहिजे. मानवी मूल्ये नैतिकता, सत्य, अहिंसा,

सभ्यता यांचा बळी नदेता मानवी कल्याण व आर्थिक विकास करण्याचे कार्य जागतिकीकरणाच्या माध्यमातून केल्यास जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गांधीवाद अडथळा ठरणार नाही.

## संदर्भग्रंथ


| अ.क्र. | ग्रंथाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| ०१. | हिंद स्वराज्य | महात्मा गांधी |
| ०२. | माझ्या स्वप्नातील भारत | महात्मा गांधी |
| ०३. | जागतिकीकरण : परिणाम आणि उपाय | गजानन खातु |
| ०४. | गांधीजी आणि सामाजिक समता | संपादक प्रा. श्रीराम जाधव |
| ०५. | जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने | प्रा.जगन कराडे |